महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २ मार्च, २०२६

क्रमांक : ३८२२ / क-१, या सचिवालयातील श्रीमती लीना अ.ससारु, सहायक कक्ष अधिकारी यांना या सचिवालयात **'कक्ष अधिकारी'** (गट-ब) (राजपत्रित) (वेतनस्तर एस:१७ ४७६००-१५११००) संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यात रिक्त झालेल्या पदावर तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

श्रीमती ससारु, सहायक कक्ष अधिकारी यांना कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

(१) सदरची पदोन्नती तदर्थ स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(२) या तदर्थ पदोन्नतीमुळे श्रीमती ससारू, सहायक कक्ष अधिकारी यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाही.

(३) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास श्रीमती ससारू, सहायक कक्ष अधिकारी यांना पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(४) सरळसेवेच्या कोट्यातील पदावर सरळसेवेने उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर श्रीमती ससारू, सहायक कक्ष अधिकारी यांना पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(५) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहे.

(६) सदर तदर्थ पदोन्नती सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यात येईपर्यंत किंवा प्रतिनियुक्तीवरील अधिकारी रुजू होईपर्यंत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी असेल.

(७) सदर तदर्थ पदोन्नती 'कक्ष अधिकारी' पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण होण्याच्या/ सूट मिळण्याच्या व स्थायित्व प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( घ. ज्ञा. देबडवार )
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**प्रतिलिपी :-**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
४) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
११) श्रीमती लीना अ. ससारु, सहायक कक्ष अधिकारी
१२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१३) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१४) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१५) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. (संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.)
१६) वैयक्तिक नस्ती
१७) निवडनस्ती